करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - १५७

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग


हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० दिनांक :३०/०३/२०२०.

वाचले:-

१. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७.
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १३/०३/२०२०
३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
४. महाराष्ट्र महसूल व वन, आपत्ती व्यवस्थान, मतद व पुनर्वसन विभागाकडील अधिसूचना क्र.डीएमयु/२०२०/सीआर- ९२/डीएम-१, दिनांक २३/०३/२०२०
५. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२०/ दिनांक २४/०३/२०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना विषाणू/प्रति. उपाय./२०२०, दि.२४/०३/२०२० व दि. २८/०३/२०२०.

---

**आदेश,**

ज्याअर्थी, शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडल उपोद्घातातील अ.क्र.३ कडील अधिसूचनेव्दारे साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ ची अंमलबजावणी राज्यात सदर अधिसूचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासून सुरु करण्यात आलेली आहे.

आणि त्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र. ४ कडील अधिसूचनेव्दारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम २०२० प्रसिध्द केलेले आहेत.

आणि त्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, शासन महसू व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागा कडील उपोद्घातातील अ.क्र.५ कडील अधिसूचनव्दारे या आपत्कालीन विषाणुचा प्रसार रोखण्यसाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीची सूचना, साथ रोग अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा उपयोग करुन आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या इतर सर्व तरतुदीनुसार संपुर्ण राज्यात दिनांक ३१ मार्च, २०२० या तारखेपर्यंत लॉकडाऊन लागू करुन, उक्त अधिसूचनेत नमूद नियम व उपाय योजना केलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.६ मधील आदेशान्वये करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दिनांक २४/०३/२०२० व दिनांक २८/०३/२०२० च्या आदेशान्वये पुढील आदेश होईपर्यंत रायगड जिल्हयात वाहतूक बंदी आदेश जारी केलेले आहेत. सदर आदेशातील अ.क्र. नंबर ०१ ते ११ व ०१ ते १६ बाबी संदर्भातील वाहतूकीस सदरचे आदेश लागू होणार नाहीत असे नमुद केले आहे. त्या व्यतिरिक्त या आदेशान्वये खालील नमुद केलेल्या बाबीस वाहतुक बंदी आदेश लागू होणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

**१.रायगड जिल्हयामधील मंडळाचे सुरक्षारक्षक व खाजगी एजन्सी मार्फत नेमणूक केलेल्या कार्यरत असलेल्या अत्यावश्यक सेवेतील सुरक्षारक्षक व त्यांची वाहने (कर्तव्यावर)**
**२.कृषी वस्तु व उत्पादने वस्तुंची आयात व निर्यात करणारी वाहने**

(टिप:- वर नमुद केल्याप्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यासाठी ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकी बाबतचे आदेश इत्यादी कागदपत्रे सोबत बाळगणे बंधनकारक असेल)

सदरच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा दंडाधिकारी**
**रायगड अलिबाग**

प्रत:- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांजकडे माहितीसाठी.

Scanned by CamScanner